01

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: मनपा/विधी/४२१/२०१९/२० दिनांक : २३/११/१९

प्रति,

मा. सदस्य सचिव
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष

**विषय :-** राज्यस्तरीय कांदळवन संवर्धन व संरक्षण समितीच्या दि. 20/9/2019 रोजी झालेल्या बैठकीतील सुचनेनुसार केलेल्या पुर्ततेबाबतचा अहवाल.

**संदर्भ :-** 1) दि. 20/9/2019 रोजी कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीच्या आठव्या बैठकीचे इतिवृत्तांत
2) आपलेकडील पत्र ऑक्टो 2019, जाक्र.ल.ले/71/2019-20

**मा. महोदया,**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध कांदळवनाच्या क्षेत्रात झालेल्या अतिक्रमणाबाबत तसेच मातीभरावाबाबत तक्रारदार श्री. धिरज परब व इतर यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे विविध तक्रारी अर्ज दाखल केले आहेत.

सदर तक्रारीच्या अनुशंगाने मा. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि. 20/9/2019 रोजी कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची आठवी बैठक घेण्यात आली होती. तसेच श्री. धिरज परब यांनी केलेल्या महानगरपालिका क्षेत्रातील तक्रारीनुसार तहसिलदार, ठाणे यांचेमार्फत दि. 08/02/2019 व दि. 08/03/2019 रोजी कांदळवन उपसमितीच्या सदस्यांनी केलेल्या स्थळपाहाणी अहवालानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करणेकरीता संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये निर्देश देऊन व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेस विनंती केलेली आहे. तरी तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुशंगाने महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीची तक्रारनिहाय माहिती सोबत जोडून देत आहे.

आपला,

(स्वाक्षरी) 13/11/19

**बालाजी खतगावकर**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**तक्रार क्र. 1 :-** तक्रारदार श्री. राजेंद्र पाटील यांच्या दि. 19/11/2018 रोजीच्या तक्रारी अन्वये Destruction of mangroves due to slum encroachment and debris is dumping at mangroves behind Neminath Heights Bildg, Gaurav City, near Mayor Bungalow, Mira road east.

**महानगरपालिकेमार्फत केलेल्या कार्यवाहीची माहिती** :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कांदळवनाचे सर्वेक्षण होऊन अद्यापपर्यंत कांदळवन क्षेत्र अधिसुचित करण्यात आलेले नाही. त्यामुळे कांदळवन क्षेत्र व 50 मीटर बफर झोनची हद्द निश्चित करता येत नाही. याकरीता मनपा क्षेत्रातील कांदळवन क्षेत्राचे सर्वेक्षण होऊन कांदळवन क्षेत्राची हद्द कायम करणे आवश्यक आहे. जेणेकरून कांदळवन क्षेत्राचे संरक्षण व 50 मी. बफर झोनच्या हद्दीचे अनुपालन करणे सोईचे जाईल.

तरीसुद्धा सदर तक्रारीच्या अनुशंगाने व उपसमितीने दिलेल्या सुचनेनुसार दि. 01/11/2019 रोजी नेमिनाथ हाईट्स इमारतीच्या समोरील भागात कांदळवन क्षेत्रालगत असलेल्या एकुण 19 झोपडया व 01 टॉयलेटचे बांधकाम निष्कासित करण्यात आलेले आहे. तसेच मौजे नवघर, सं. क्र. 280 जुना 91 नविन सेवन इलेव्हन सॉलेस्टिक स्कूल व गौरव सिटी सुवर्णा इमारतीच्या मागे कांदळवन क्षेत्रातील एकुण 26 झोपडयांचे बांधकाम दि. 04/11/2019 रोजी निष्कासित करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे यापुर्वी सदर जागेवर दि. 13/3/2019 रोजी दुपारी 1.30 वाजता रॅबिटने भरलेला डंपर क्र. एम. एच. 47 वाय 0355 खाली करण्यात आल्याचे निदर्शनास आल्यावरून सदर डंपरचे वाहनचालक व वाहन मालक यांच्याविरुद्ध काशिमिरा पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे दि. 13/5/2019 रोजी सायं. 5.30 वाजता रॅबिटने भरलेला डंपर क्र. एम. एच. 04 जीसी 7814 खाली करण्यात आल्याचे निदर्शनास आल्यावरून सदर डंपरचे वाहनचालक व वाहन मालक यांच्याविरुद्ध काशिमिरा पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

बालाजी खतगावकर
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका